# सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ सह कलम ३८ नुसार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राची सुधारित विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्र. डीओ/पीडी-४६९/डीपी(एसआर)/५३८ , दि.२५/११/२०१९

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण (यापुढे उक्त प्राधिकरण उल्लेखलेले) मुळ हद्दीची विकास योजना शासन निर्णय क्रमांक टीपीएस/१८९१/१४१२/नवि-१३, दि. २८/११/१९९५ अन्वये मंजूर आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ सह कलम ३८ अन्वये उक्त प्राधिकरणाने मंजूर विकास योजना सुधारीत (दुस-यांदा) तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी त्यांचा सर्वसाधारण सभेचा  ठराव क्र. ३४०/१७, दि. ०९/०८/२०१९ अन्वये मान्यता दिलेली आहे.  त्या नुसार सदरची सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ नुसार उक्त प्राधिकरणाच्या विकास योजनेमध्ये समाविष्ठ असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरण कार्यालय, निगडी-पुणे या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या या बाबत काही सुचना / हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसाच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरण, निगडी यांच्याकडे लेखी स्वरुपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/ हरकतीचा योग्य तो विचार करण्यात येईल.

ठिकाण :-  निगडी, पुणे - ४४.

(प्रमोद यादव)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास
प्राधिकरण, निगडी-पुणे.

# NOTICE

## Declaration of Intention to prepare Revised Development Plan for Pimpri Chinchwad New Town Development Authority as per section 23 read with section 38 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966.

No. :- DA/PD-469/DP(SR)/1383 Date :- 15/11/2019

Government of Maharashtra in Urban Development Department, vide it's Notification No. TPS/1891/1412/UD-13, Date- 28/11/1995 has sanctioned development plan of Pimpri Chinchwad New Town Development Authority (Herein after referred as the said Authority) as per section 31 (1) of Maharashtra Regional & Town Planning Act. 1966

The said Authority by it's Resolution No.340/17, Date. 09/08/2019 has declared it's intention to prepare Revised Development Plan (Second) as per provision of section 23 read with section 38 of Maharashtra Regional & Town Planning Act 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundaries of the area included in Revised Development Plan of the said Authority is kept open for inspection by the public on working days, during office hours at the office of the Pimpri Chinchwad New Town Development Authority as required under section 23 of Maharashtra Regional & Town Planning Act. 1966.

Any suggestion / objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Executive Officer of Pimpri Chinchwad New Town Development Authority within a period of 60 (Sixty) days from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette. The suggestion / objection shall be duly considered while preparing the Development Plan.

Place :- Nigdi-Pune-14.

(Pramod Yadav)
Chief Executive Officer,
Pimpri Chinchwad New Town
Development Authority, Nigdi-Pune